# बृहन्मुंबई महानगरपालिका

## पेन्शन अदालत - सूचना पत्र

क्र.प्रले(को.)/एफपीपी/नप्र/१३६.
दि.:-२४.०४.२०१७.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या सर्व खाते प्रमुख / विभागीय सहाय्यक आयुक्त / अधिष्ठाता / रुग्णालय प्रमुख यांच्या स्तरावर पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात येत आहे. सदर विभागावर पेन्शन अदालतीमध्ये प्रथमत: महानगरपालिका निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातात त्यातूनही जी प्रकरणे मार्गी लागणार नाहीत अशाच प्रकरणांचा समावेश प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या उच्चस्तरीय पेन्शन अदालतीमध्ये करुन प्रलंबित प्रकरणांवर निर्णय घेतले जातात. सदर ‘उच्चस्तरीय पेन्शन अदालत’ प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी आयोजित केली जाते. त्यानुसार मंगळवार दि.०९.०५.२०१७ रोजी सकाळी ११:३० ते १२:३० वाजेपर्यंत सदर ‘उच्चस्तरीय पेन्शन अदालत’ आयोजित करण्यात येत असून त्याचा पत्ता खालीलप्रमाणे आहे :-

प्रमुख लेखापाल (कोषागार),
प्रमुख लेखापाल (कोषागार) यांचे कार्यालय,
बृहन्मुबई महानगरपालिका, ई-विभाग कार्यालय इमारत,
तिसरा मजला, शेख हफीजुद्दीन मार्ग,
भायखळा (प.), मुंबई-४०००0८.

सही/-
२४.०४.२०१७
**लेखा अधिकारी (एफपीपी)**